मेट्रोचा पहिला जिना चाचणीसाठी कार्यान्वित

# सिद्धिविनायक स्थानकातील सरकता जिना पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो मार्ग ३ चे काम वेगाने सुरू आहे. तर, गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर सिद्धिविनायक मेट्रो स्थानकातील पहिला सरकता जिना १८ दिवसांच्या विक्रमी वेळेत चाचणीसाठी कार्यान्वित करण्यात आला आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्याकडून देण्यात आली.

भुयारी मेट्रो ३ या मार्गातील बहुतांशी स्थानकांचे काम पूर्णत्वाच्या जवळपास आले आहे. विशेषत: कोरोना काळात देखील मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आपल्या कामाचा वेग कायम ठेवत स्थानकाचे काम मार्गी लावण्यावर भर दिला. प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून, स्थापत्याची एकूण (सिव्हिल वर्क) ७९ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. सार्वजनिक वाहतूक प्रकल्प राबवित असताना हरित धोरणाचे कठोर पालन केले जाईल. पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी शक्य होतील ते प्रयत्न केले जातील, असा दावा कॉर्पोरेशनकडून करण्यात आला आहे.

मेट्रो स्थानकावर सरकते जिने बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. एम.आय.डी.सी. मेट्रो स्थानकापासून याचा प्रारंभ झाला. सरकत्या जिन्याच्या नमुना संचाची सुरुवातीला चाचणी होत आहे. मेट्रो - ३ मार्गावरील सर्व स्थानकांवर एकूण ४१४ सरकते जिने बसविण्यात येणार आहेत. तर, सरकत्या जिन्यामध्ये पुनरुत्पादक ऊर्जा बचत यंत्रणा आहे. ऊर्जेची बचत होणार आहे.



भुयारी मेट्रो ३ या मार्गातील बहुतांशी स्थानकांचे काम पूर्णत्वाच्या जवळपास आले आहे. हा जिना १८ दिवसांत पूर्ण झाला.

## स्थानकांचे काम

| | |
|---|---|
| कफ परेड ७८ % | सिद्धिविनायक ८०% |
| विधानभवन ८३ % | दादर ६८ % |
| चर्चगेट ८० % | शीतलादेवी ५५ % |
| काळबादेवी २९ % | धारावी ७३ % |
| सीएसटी ७६ % | बीकेसी ७० % |
| हुतात्मा चौक ८० % | विद्यानगरी ७४ % |
| गिरगाव २९ % | सांताक्रूझ ७७ % |
| ग्रँटरोड ३६ % | विमानतळ ७७ % |
| मुंबई सेंट्रल ७८ % | मरोळ ८२ % |
| महालक्ष्मी ७७ % | विमानतळ ७६ % |
| सायन्स म्युझियम ७३ % | सहार रोड ७६ % |
| आचार्य अत्रे चौक ४३ % | एमआयडीसी ८५ % |
| वरळी ६८ % | सीप्झ ८३% |